नियमित फौजदारी खटला नं.३८१/२०२४
निशाणी- ३०

**सदर साक्षीदाराची साक्ष व्ही. सी. द्वारे नोंदविण्यापूर्वी आवाज स्पष्टपणे येत असल्याची व चित्रफीत व्यवस्थीत दिसत असल्याबाबतची खात्री केली त्यानंतर साक्षीदाराचा जबाब नोंदविण्यास १.१० वा. सुरुवात केली आणि १.२५ वा. जबाब नोंदवुन पुर्ण झाला.**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा जबाब.

मी शपथेवर कथन करते की,
माझे नांवः- सुमन रविंद्र दायमा
वयः- २९वर्षे, धंदाः- गृहिणी
राहणारः- संदिप नगर सारस नगर, अहिल्यानगर

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सीमा शेख यांचेकडूनः-

१. दि. २१/०५/२०२३ रोजी मी, माझे पती आणि सासु सोबत बसने पुण्याला जाणेसाठी तारकपुर बस स्टॅण्डवर आलो होतो. तेव्हा छ.संभाजी नगर ते महाड बस आली त्या बसच्या मागच्या सिटवर आम्ही जाऊन बसलो. त्यावेळेस आमच्या पुढच्या सीटवर बसलेल्या एका महिलेने तिचे पर्समधील पैसे चोरीला गेले असे सांगितले. माझ्या पतीने सुध्दा मला माझी पर्स तपासणेस सांगितले असता त्यामधुन रोख १५,०००/- चोरीला गेल्याचे समजले. आम्ही सगळीकडे पाहिले असता पैसे मिळुन आले नाही. म्हणुन माझ्या पतीने तोफखाना पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती.

उलट तपास आरोपी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. बी. एम. झगडे यांचेकडूनः-

२. उलटतपास नाकारला.

उलट तपास आरोपी क्र. २ व ३ तर्फे विधिज्ञ श्री. हानिफ शेख यांचेकडूनः-

३. हे म्हणणे खरे आहे की, जबाब दिल्यानंतर मी पोलीस स्टेशनला गेले नाही व पोलीसांनी मला आरोपी दाखविले नाहीत.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
Digitally signed by LAXMIKANT SUDAMRAO PADHEN
DN: cn=LAXMIKANT SUDAMRAO PADHEN, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6946981, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2026.01.14 17:02:21 +0530
(एल.एस.पाढेण)
मुख्य न्यायदंडाधिकारी
अहमदनगर.

दि.१४/०१/२०२६.